महासागर

गुरूवार दि. 26 सप्टेंबर 2024

अमरावती

पान 3

# आदिवासी महिलांची पाण्यासाठी पावसाळ्यातही भटकंती

## माखला गावात पाण्याकरिता एक किलोमीटरपर्यंत पायपीट

**मारोती पाटणकर**

**चुरणी, (दि.25)**- चिखलदरा तालुक्यातील दूसरे निसर्गसंपन्न गाव म्हणून माखला या गावाची ओळख आहे. परंतू येथील पाणीटंचाई या सूंदर गावाचे एक कुरुप वास्तव आहे. गावात पाण्याचे योग्य स्त्रोत नसल्याने पावसाळ्यातही गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याकरिता एक किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागते.

या गावाची लोकसंख्या 1200 जवळपास आहे. शेतमजूरी व इतर काम करुन आपला उदरनिर्वाह करणाऱ्या गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याकरिताही प्रचंड मेहनत घ्यावी लागते. गावकऱ्यांचा अर्धा दिवस पाणी भरण्यातच खर्च होतो. अजूनही या गावातील नागरिकांना एक किलोमीटर अंतरावरून पिण्याच्या पाण्याचा हंडा डोक्यावर आणावा लागतो.

संविधानातील कलम 21 नुसार प्रत्येक भारतीयांना जगण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. परंतू चांगले जगण्याचा अधिकार फक्त मोजक्याच लोकांना मिळाला आहे. पहाडात राहणाऱ्या गावकऱ्यांना आपल्या मुलभूत अधिकारासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो. एकीकडे गावागावात 'जल जीवन मिशन %हर घर नल, हर घर जल% योजनेतून शुध्द पाणी पोहोचत आहे. तर दुसरीकडे माखलावासीयांना पिण्याच्या पाण्याकरिता भंटकती करावी लागत आहे.

गावात पाण्याची समस्या खूप आहे. बराच वेळ पाणी भरण्यात जातो. आमचा एक किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागते. गावाच्या खाली उतारावर विहीर आहे, अशा कठीण ठिकाणावरून पाणी आणावे लागते. संपूर्ण वेळ पाणी आणण्यात जातो. आठ महिने अगोदर पाणी आणतांनी माझे स्वत:चे पाय मोडले होते. उन्हाळ्यातही मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई असते शासनाने या ठिकाणी पाण्याची समस्या सोडवावी.

**देवकी मधुकर मावसकर ,उपसरपंच**

## 1100 मिमी पाऊस, तरीही टंचाई

एका नोंदीप्रमाणे मेळघाटातील माखला गावात 1100 मिलिमीटर पाऊस पडतो. तरीही गावात पाणी टंचाई आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. याचा शोध घेतला तर असे लक्षात येते की, आज माखला गावातील लोक वन्यजीव संरक्षण कायद्याच्या जाचक अटीचे हे परिणाम भोगत आहेत. या गावात नळ योजनेचे वीज कनेक्शन हे सोलर पॅनल वर आहे. नेमके पावसाळ्यातील 4 महिने माखला गावातील सोलर पॅनल हे काम करत नाहीत. त्यामुळे गावातील पाण्याच्या टाकीत पाणीच येत नाही. त्यामुळे नळालाही पाणी येत नाही. गावातील महिला पुरुष असे निसरड्या उताराच्या वाटेवरून दररोज 1 किलोमीटर डोक्यावर हंडे घेऊन ये-जा करतात. काही पुरुष मंडळी पेट्रोल खर्च करुन दुचाकी ने पाणी आणतात. गरोदर महिला, बाळंत महिलासुद्धा डोक्यावर हंडे आणतात. लहान मुलांची अभ्यासाचा वेळ पाणी भरण्यात जातो. गावातील लोक म्हणतात आमच्या गावात महावितरणची वीज वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे येऊ शकत नाही. त्यामुळे पाण्याची मोटार चालत नाही. गावातील पांदण रस्ते, विहीरीकडे जाणारे रस्ते वन्यजीव संरक्षण कायद्या मुळे एनओसी मिळत नसल्याने होत नाही. आमच्या गावच्या उपसरपंच पाणी भरतांना पडल्या. आणि त्यांचा पाय मोडला. असे गावकरी बोलताना सांगतात पाण्या अभावी घरात वाद होतात. पाणी डोक्यावर कोणी आणावे? महिलांच्या डोक्यावरचा हंडा काही सुटत नाही. भविष्यात पाणी संकट मिटेल की, नाही हे न उलगडणारे कोडे आहे.

## बाहेरच्या जगाशी संबंध नाही

डिजिटल इंडियाच्या काळात गावात होणारे बिएसएनएल चे टॉवर टायगर प्रोजेक्ट च्या एनओसी अभावी थांबले. पावसाळ्यात सोलर पॅनल काम करत नाहीत. त्यामुळे वीज नाही धान्याचे पीठ दळायला दुसऱ्या गावात जावे लागते. मुलांना घरात दिव्या अभावी अभ्यासाचे वातावरण नाही. गावात गावठाण नाही. व्याघ्र प्रकल्पात गाव कोअर गाभा क्षेत्रात असल्याने गावाला सामूहिक वन हक्क कायद्या नुसार सामूहिक वन हक्क प्रमाणपत्र मिळाले नाही. चराई साठी कंपार्टमेंट नाही. गवळी, आदिवासी लोकांचे जनावरांना चराई साठी अडवणूक होते. दंड वसूल केला जातो. वण्यजीव कायद्यामूळे माखला या गावाचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटला आहे.

# दुचाकी चोराला अटक

## 68 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)**- गाडगेनगर पोलिस ठाण्यातील डीबी पथकाने एका अट्टल दुचाकी चोराला अटक केली. सुरज ऊर्फे मोंट्या गनेश तानोळे (27, रा. नवसारी गावठान, अमरावती, ह.मु. नांदगाव पेठ, जुनी वसाहत झोपटपट्टी) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून मोबाईल, एक सायकल व दोन दुचाकी असा एकुण 68 हजार रुपये किमंतीच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राजेंद्र मधुकर सावरकर (50, रा. कस्तुरी पार्क, नवसारी, अमरावती) यांची दुचाकी 30 ऑगस्ट रोजी नवसारी चोरी गेली होती. या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांनी गुन्हा नोंदवून, तपास सुरु केला होता. दरम्यान गुप्त माहितीवरून पोलिसांनी एका संशयीत इसमाला ताब्यात घेतले. तो इसम हा गाडगेनगर हद्दीतील सराईत चोर सुरज तानोळे असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याची चौकशी केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून एमएच 27 बीके 1553, एएच-बीपी - 9545 व एक

सायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, पोलिस निरीक्षक प्रशांत माने, ब्रम्हा गीरी यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मनोज मानकर, पोलिस हवालदार निलेश जुनघरे, संजय भिलाये, नितीन कामडी, राजेश गुरेले, सागर धरमकर, सुशांत प्रधान, मतीन शेख यांनी केली.

## सेंट्रिंगचे काम करताना पडून मजुराचा मृत्यू

**अमरावती** - राहटगाव परिसरातील स्वामी समर्थ नगर येथे 25 सप्टेंबर रोजी सायंकाळी 4 वाजता घराच्या बांधकामस्थळी सेंट्रिंगचे काम करत असताना खाली पडून एका मजुराचा मृत्यू झाला. नारायण स्वामी कृष्ण स्वामी मुत्तूर (60, रा. राहुल नगर, फ्रेजरपुरा) असे मृत मजुराचे नाव आहे. नारायण स्वामी कृष्ण स्वामी हे बुधवारी रहाटगाव संकुलातील स्वामी समर्थ नगर येथे कार्यरत होते. यावेळी ते अचानक खाली पडले. इतर मजुरांच्या मदतीने त्यांना इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे तपासणीअंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी शवागृहात पाठवण्यात आला आहे. याप्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# वडिलांने केले अल्पवयीन मुलाचे लैंगिक शोषण



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 25)** - स्थानिक राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या एका अल्पवयीन मुलाचे पित्याकडून लैंगिक शोषण झाल्याचा धक्कादायक प्रकार 24 सप्टेंबर रोजी उघडकीस आला आहे. या घटनेची तक्रार 29 वर्षीय विवाहितेने राजापेठ पोलिसांत दिली आहे. तिच्याच पतीने तिच्या 6 वर्षाच्या मुलाशी अश्लील कृत्य करून लैंगिक शोषण केल्याचे तक्रारीत सांगितले. त्या तक्रारीच्या आधारे राजापेठ पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून आरोपी पित्याला अटक केली आहे.

महिलेने फिर्यादीत असे म्हटले आहे की, सदर महिलेचा आरोपीसोबत 2009 साली प्रेमविवाह झाला. सदर महिलेचा व्यवसाय ब्युटी पार्लरचा आहे. ती महिला 1 जुलै रोजी नागपूरला गेली होती. त्यावेळी 6 वर्षाचा मुलगा त्याच्या वडिलांसोबत होता. नागपुरातून शिक्षण पूर्ण करून महिला घरी परतली असता काही घरगुती कारणावरून तिचा पतीसोबत वाद झाला. अशा परिस्थितीत ती मुलासह नागपुरात परत गेली आणि 8 दिवसांनी नांदगाव खंडेश्वर तहसील अंतर्गत माहेरी गेली. दरम्यान तिला मुलासोबत वडिलांनी केलेले कृत्य माहिती पडले. त्यामुळे त्यांनी तत्काळ चाइल्ड हेल्पलाइनची मदत घेतली. त्यानंतर त्यांना मोबाईलवर फोन करून संपूर्ण प्रकार सांगितला. त्यावेळी त्यांना मुलासह राजापेठ पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर महिलेने आपल्या मुलासह राजापेठ पोलीस ठाणे गाठले.

# 20 वर्षीय तरुणाने गळफास लावून घेतला



**अमरावती** - फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील यशोदा नगर क्रमांक 1 मध्ये राहणारा सुशांत विशाल जवंजाळ (20) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. सुशांत हा हॉटेलमध्ये क्लिनर म्हणून काम करायचा. त्याने सुशांतने साडीने गळफास लावून आत्महत्या केली. फ्रेजरपुरा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज अमरावतीत

## अमरावती विधानसभा मतदार संघात विविध विकास कामांचे उदघाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )**- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांचे गुरुवार दिनांक 26 सप्टेंबर 2024 रोजी अमरावतीमध्ये आगमन होणार आहे. त्यांच्या हस्ते अमरावती विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांचे उदघाटन होणार आहे. या उदघाटन कार्यक्रमाचा मुख्य सोहळा नियोजन भवन येथे होणार आहे.

सकाळी 9 वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अमरावती येथे आगमन होईल. त्यानंतर सर्वप्रथम तपोवन परिसर येथे मजीप्रा अमृत-2 अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना (किंमत अंदाजे 865.26 कोटी) प्रकल्पाच्या कोनशिलेचे अनावरण, त्यानंतर सकाळी 9.30 वाजता छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण मानवविकास संस्था (सारथी ) पुणे अधिनस्त मौजे नवसारी येथील विभागीय कार्यालय, वसतीगृह, अभ्यासिका इत्यादी बाबींच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण (किंमत अंदाजे 172 कोटी), तसेच सकाळी 9.45 वाजता अमरावती विधानसभा मतदार संघातील पश्चिम वळण रस्तावर लालखडी येथे रेल्वे क्रॉसिंगवर चौपदरी उड्डाणपुलाचे बांधकामाच्या कामाच्या कोनशिलेचे अनावरण (किंमत अंदाजे 115 कोटी), नायरा पेट्रोल पंप ते चांगापुर फाट्यापर्यंतच्या मार्गाचे निर्मिती (किमंत अंदाजे 15 कोटी) कामाचे भूमिपूजन, जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) परिसरात जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावती परिसरातील 200 खाटांच्या नूतन इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण (किमंत अंदाजे 66.84 कोटी), याच शृंखलेत पुढे सकाळी 10.30 वाजता विभागीय क्रीडा संकुल परिसर अमरावती येथे खेळाचे मैदानाची निर्मिती करणे किंमत अंदाजे 29 कोटींच्या कामाच्या कोनशिलेचे अनावरण,

तसेच अमरावती विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांच्या उदघाटनाचा मुख्य कार्यक्रम सकाळी 11 वाजता जिल्हा नियोजन भवन येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी नगरोत्थान (योजना 100 कोटी), अमृत सरोवर-2 वडाळी उद्यान विकसित करणे (किंमत अंदाजे 19.72 कोटी), जी.एस.टी बिल्डिंग बांधकाम फर्निचर व विद्युतीकरण कामे (किंमत अंदाजे 17 कोटी), शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथे पायाभूत सुविधांची विकास कामे करणे किंमत (अंदाजे 10 कोटी), राज्य उत्पादन शुल्क बिल्डिंग बांधकाम करीता (किंमत अंदाजे 4 कोटी) या कामांचे उदघाटन पवार यांच्या शुभ हस्ते नियोजन भवन अमरावती येथून ऑनलाईन केल्या जाईल. 26 सप्टेंबर रोजी अमरावती विधानसभा मतदार संघातील विकास कामांच्या उदघाटनाला सर्व अमरावतीकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावतीच्या आ.सुलभा संजय खोडके यांनी केले आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय चिखली , पं . स. चिखलदरा जि. अमरावती.**

**साहित्य ई – निविदा सूचना क्र. ०२ दि. २६ /०९/ २०२४**

ग्राम पंचायत कार्यालय चिखली पं.स. चिखलदरा जि. अमरावती मार्फत खालील विकासात्मक कामे करिता नोंदणीकृत कंत्रांटदाराकडून दि. २६/०९/२०२४ पासून पुढील कालावधी पर्यन्त निविदा मांगविण्यात येत आहे.

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | अनामत रक्कम | योजनेचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चिखली येथे कोंक्रीट रस्ता बांधकाम | १ लक्ष रुपये | १००/- | १००० /- | | |
| २ | चिखली येथे पानी पुरवठयाचे कामे | १.५ लक्ष रुपये | १५०/- | १५००/- | | |
| ३ | केशरपुर येथे पाणी पुरवठयाचे कामे | १.५ लक्ष रुपये | १५०/- | १५००/- | | |
| ४ | केली येथे पाणी पुरवठयाचे कामे | १.५ लक्ष रुपये | १५०/- | १५००/- | | |
| ५ | भिरोजा येथे पाणी पुरवठयाचे कामे | १.५ लक्ष रुपये | १५०/- | १५००/- | | |
| ६ | SLMW बाबत कामे करणे | 3 लक्ष १३ .३१८ रुपये | २००/- | ३०००/- | | |
| ७ | चिखली येथे नाली बांधकाम करणे | १.३० लक्ष रुपये | १३०/- | १३००/- | १५ वित्त आयोग अतर्गत विविध विकासात्मक कामे २४/२५ | निविदा |
| ८ | केशरपुर येथे नाली बांधकाम करणे | १ ३० लक्ष रुपये | १३०/- | १३००/- | | |
| ९ | भिरोजा येथे नाली बांधकाम करणे | १.३० लक्ष रुपये | १३०/- | १३००/- | | |
| १० | केली येथे नाली बांधकाम करणे | १.३० लक्ष रुपये | १३०/- | १३००/- | | |
| ११ | केशरपुर येथे समाज मंदिर दुरुस्त करणे | १ लक्ष रुपये | १००/- | १०००/- | | |
| १२ | केली येथे रस्ता बांधकाम | १.२० लक्ष रुपये | १२०/- | १२००/- | | |
| १३ | भिरोजा कोंक्रीट रस्ता बांधकाम | १.२० लक्ष रुपये | १२०/- | १२००/- | | |

**सूचना :-**

१. वरील विकासात्मक कांमाकरिता निविदा नोंदिणीकृत मान्यता प्राप्त कंत्रांटदारकडून सदर कामाची निविदा मागविण्यात येत आहे.
२. निविदा स्वीकारणे दि. २६/०९/२०२४ ते ०३/१०/२०२४ ला संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राहील.
३. श्यकतो सदर निविदा ०४/१०/२०२४ ला उघडण्यात येईल.
४. निविदा सबंधीचे सर्व अधिकार रद्द करणे अथवा स्वीकारणे ग्रा. प. चिखली सरपंच/सचिव यांनी राखून ठेवले आहे.

सरपंच/ सचिव
ग्रामपंचायत चिखली

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

## बुधवार ठरला आंदोलनवार

# शिक्षकांसह कर्मचाऱ्यांचे राज्य सरकारविरोधात निदर्शने

**उपसले संपाचे हत्यार**

महासागर प्रतिनिधी

अमरावती,( दि.25 )- आपल्या प्रलंबित विविध मागण्याकरिता शिक्षकांसह राज्य कर्मचाऱ्यांनी बुधवारी( दि.25 ) राज्य सरकारविरोधात बेमुदत संपाचे हत्यार उपसून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात निदर्शने केली. या वेळी पोलीसांचा कडकोट बंदोबस्त जिल्हाधिकारी परिसरात लावण्यात आला होता. या आंदोलनमध्ये विविध शिक्षक व राज्य कर्मचारी संघटनांनी सहभाग घेतला.

## आम्हाला शिकवू द्या ; गुरुजींचा `आक्रोश'!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक प्राथमिक शाळा या उपक्रमांच्या प्रयोगशाळा बनल्या आहेत. शिक्षकांना शिकवण्याचे काम सोडून विविध ऑनलाईन कामे व अनावश्यक उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांपुढे जायला वेळच मिळत नाही. त्यामुळे आम्हाला शिकवू द्या, असा टाहो फोडत जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. या मोर्चामध्ये जिल्ह्यातील शिक्षक उस्फूर्तपणे सहभागी झाले होते. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

सततच्या अशैक्षणिक कामांच्या वाढत्या वारंवारीतेमुळे शिक्षकांना शिकविण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपासून शिक्षकांना दूर लोटण्याचे धोरण सरकारने आखले आहे की काय, अशी शंका उपस्थित केली जात आहे. दुर्गम भागातील कमी पटाच्या शाळा बंद करून तेथील विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहातून बाहेर फेकण्याचे काम सरकार करत आहे. 20 पेक्षा कमी पटाच्या शाळेवर निवृत्त शिक्षक किंवा कंत्राटी शिक्षकाची नेमणूक करून सरकार अप्रत्यक्षपणे वेठबिगारीचे धोरण राबवित आहे. शिक्षकांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांबाबत शासन स्तरावरून कोणतीही अनुकूल भूमिका घेतली जात नाही. प्रश्न समजून घेणे व त्यावर तोडगा काढण्याच्या बाबत सरकार प्रचंड उदासीन आहे. त्यामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकांपुढे तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. राज्यातील सर्व जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शिकविणारे प्राथमिक शिक्षक सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक भारती, कास्ट्राईब शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा अमरावती,प्रहार शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य उर्दु शिक्षक संघटना,अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटना,अखिल महाराष्ट्र उर्दु शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (संभाजी थोरात प्रणित), महाराष्ट्र राज्य अपग्रेड मुख्याध्यापक महासंघ,महाराष्ट्र राज्य एकल शिक्षक सेवामंच,पदवीधर प्राथमिक शिक्षक व फ्रेंद्रप्रमुख संघटना ,वसंतरावजी नाईक अधिकारी कर्मचारी संघटना,चेतवा कर्मचारी संघटना यांच्यासह आदी संघटना सहभागी झाल्या होत्या.खासदार बळवंत वानखडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड, जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती जयंत देशमुख यांचीही उपस्थिती यावेळी या मोर्चाला लाभली.

## राज्य सरकारची प्रतिक्रात्मक प्रेतयात्रा

ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस (आयटक) ने कर्मचाऱ्यांच्या बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर आपल्या मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनात राज्य शासनाविरुध्द निदर्शने केली. यावेळी त्यांनी राज्य सरकारचे प्रतिक्रात्मक अंत्ययात्रा काढत, मेला रे मेला मुख्यमंत्री मेला.. अशा घोषणा दिल्या. आयटकच्या निवेदनात सांगितले की, शालेय पोषण आहार अंतर्गत 18 वर्षापासुन कार्यरत असलेल्या स्वयंपाकी मदतनीस राज्य शासनाच्या पातळीवरील प्रलंबीत न्याय मागण्या असुन राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी आयटक संघटनेच्या आंदोलनाच्या माध्यमातुन प्रलंबीत मागण्या निकाली काढण्याचे आश्वासन दिले. मात्र शिक्षणमंत्री यांनी कुठल्याही प्रकारची दखल घेतल्याचे दिसत नाही. त्यामूळे शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्यामध्ये तिव्र असंतोष निर्माण झाला. त्यासाठी शालेय पोषण आहार कर्मचारी युनियण आयटक न्याय मागण्या मिळुन घेण्यासाठी बरेच आंदोलन, मोर्चो, उपोषणे केले मात्र इतर राज्या प्रमाणे मानधन देण्यात आले नाही तरी शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना पॉंडेचरी राज्यात मासीक 14 हजार रुपये, केरळ राज्यात 10 हजार रुपये तर तामिडनाळु राज्यात 7700 रु. मानधन दिले जाते. हे संघटनेने लक्षात आणून दिले असता राज्य सरकारने महाराष्ट्रात शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना 1 हजार रुपया वरून 1500 अशी तुटपुंजी मानधन वाढ केली. ऐवढ्या रुपयात कुंटूब चालवयाचे कसे, मुलांना शिक्षण द्यायचे कसे असा प्रश्न कर्मचाऱ्यामध्ये उपस्थित होत आहे. मुख्यमंत्री यांनी तत्काळ आयटक पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावावी व मानधनाच प्रश्न निकाली काढावा. सेंट्रल किचन बंद करण्यात यावे, शालेय पोषण आहार कर्मचारी यांना स्थायी ऑर्डर देऊन शिपाई या पदावर नेमणूक करावी, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना 21 हजार रुपये मानधन देण्यात यावे. शालेय पोषण कर्मचाऱ्यांना मे-जुन चे मानधन देण्यात यावे. अशा विविध मागण्यांकरिता हे आंदोलन करण्यात आले.

## ओबीसी बहुजन आघाडी आक्रमक

ओबीसी विद्यार्थ्यांसाठीचे स्वतंत्र वसतीगृह अद्यावत सोयी सुविधा करून सुरू करण्यात यावे या मागणीसाठी तसेच अंतरवाली सराटी जि. जालना येथे ओबीसी, भटक्या विमुक्त जाती जमातीच्या वतीने आरक्षण बचाव आमरण उपोषण सुरू आहे. त्याला पाठिंबा म्हणून सुद्धा ओबीसी बहुजन आघाडी अमरावती जिल्ह्याच्या वतीने विभागीय समाज कल्याण भवन समोर आज एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र असे 72 वसतीगृह राज्य शासनाने मंजूर केले आहे. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात अद्यावत सोयी सुविधा करून ओबीसीच्या विद्यार्थ्यांसाठीचे वसतीगृह सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी तथा अंतरवाली सराटी येथे ओबीसी बहुजन भटक्या विमुक्त जाती, जमातीच्या वतीने आरक्षण बचाव आमरण उपोषण सुरू आहे. बाळासाहेब बटुळे, ॲड.मंगेश ससाने, संतोष वीरकर, शरद राठोड, प्रा.विठ्ठल तळेकर, बाळासाहेब दखणे या 6 योद्धांचे आमरण उपोषण सुरू आहे. याची दखल राज्य शासन व प्रशासनाने घेतली नाही. परिणामी ओबीसीच्या भावना तीव्र झाल्या. परिणामी याला पाठिंबा म्हणून ओबीसी बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रवीण पेटकर यांच्या नेतृत्वात तसेच आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा विदर्भ प्रभारी डॉ. ज्ञानेश्वर गोरे, विदर्भ अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती माजी सभापती अशोक दहीकर, ओबीसी जनमोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व्ही ,डी. काळे यांच्या उपस्थितीत विभागीय समाज कल्याण भवन समोर एक दिवसीय धरणे आंदोलन सकाळी 10 ते दुपारी 3 पर्यंत आयोजित करण्यात आले.

*दर्यापूर-नगर परिषदे तर्फे आयोजीत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा 2024 अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, यातच बुधवारी मानवी साखळी चे आयोजन करत जनजागृती करण्यात आली.*

# गुटख्यावर पोलिसांची धाड, लाखोंचा गुटखा जप्त

महासागर प्रतिनिधी

अमरावती,( दि.25 )- ग्रामीण जिल्ह्यातील शिरजगाव आणि माहुली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या गुटखा विक्रीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणच्या पथकाने मोठी कारवाई केली.

**शिरजगाव पोलीसांची करवाई**

मंगळवार(दि.24 )रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिरजगाव पोलीसांसोबत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की करजगाव येथे एक किराणा दुकानात मोठ्या प्रमाणात गुटखा साठवला गेला आहे. विनायक अशोकराव काळे यांच्या दुकानावर छापा मारला असता, आरोपी पोलिसांची चाहूल लागताच पळून गेला.

दुकानाची पाहणी केली असता, सुमारे ?2,06,400 किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला, ज्यात विमल, पानपराग, गुजरात गोल्ड, भाग्य इत्यादी ब्रॅण्ड्सचा समावेश होता.

या प्रकरणी शिरजगाव पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम 123, 223(ब), 274 आणि 275 अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला असून पुढील तपास सुरू आहे.

### माहुली पोलीस ठाण्याची कारवाई

तसेच माहुली पोलीस ठाण्याच्या हद्दीतही स्थानिक गुन्हे शाखेने आणखी एक मोठी कारवाई केली. आरोपी अ. रऊफ मो. युरूफ (वय 60) यांनी त्यांच्या गोदामात अवैधरित्या गुटखा साठवून ठेवला असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी छापा टाकला. तपासणी दरम्यान, त्याच्या गोदामातून ?1,12,480 किमतीचा पानपराग, नजर-9000, बाजीराव, बाजीराव गोल्ड, नागपुरी प्रीमियम या ब्रॅण्ड्सचा गुटखा जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 123, 223(व), 274 आणि 275 अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला आहे, आणि माहुली पोलीस पुढील तपास करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, स.पो.नि. गजानन वाघ (माहुली पोलीस), स.पो.नि. महेंद्र गवई (शिरजगाव पोलीस), स.पो.नि. सचिन पवार यांच्यासह नितीन चुलपार, युवराज मानमोठे, रविन्द्र वन्हाडे, स्वप्निल तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, बळवंत दाभणे, रविंद्र बावणे, पंकज फाटे, भुषण पेठे आणि चालक प्रशांत राजस यांनी या मोहिमेत मोलाची भूमिका बजावली.पोलीसांची ही कारवाई गुटखा विक्रेत्यांना धडा शिकवणारी असून, अमरावती ग्रामीण जिल्ह्यात गुटखा विक्रीवर कठोर निर्बंध लावण्याच्या दृष्टीने एक मोठे पाऊल आहे.

# भाजपा चे पं.स.कार्यालयात ठिय्या आंदोलन

## गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

महासागर प्रतिनिधी

वरुड, ( दि.25 )- गटविकास अधिकारी सतीश देशमुख यांनी तालुक्यातील घरकुल, सामूहिक सिंचन विहीर व इतर लाभार्थ्यांना वेठीस धरून त्यांचे आर्थिक नुकसान केल्याचा आरोप करित त्यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करून नुकसानग्रस्त लाभार्थी यांचे पैसे खात्यावर टाकण्याच्या मागणीकरिता बुधवारी येथील भारतीय जनता पक्षाच्या वतीने गटविकास अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देशमुख यांचा निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मध्यस्थी केल्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले.

पंचायत समिति कार्यालय वरुड येथील गटविकास अधिकारी सतीश देशमुख हे डीएससी सोबत घेऊन रजेवर गेलेले असल्यामुळे तालुक्यातील सामूहिक सिंचन विहीर व घरकुल लाभार्थी यांचे सतीश देशमुख यांच्या हलगर्जीपणामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच वरुड तालुक्यातील मोदी आवास योजनेचे एकूण 1374 लाभार्थी ज्यांचे घरकुल मंजुरात देऊन जवळपास सर्वच लाभार्थी यांनी घरकुलचे कामे सुरू केलेले आहेत. अश्या लाभार्थी यांचे शासनाकडून आलेले पैसे सुद्धा डी.एस.सी. नसल्यामुळे आहारीत करता आलेले नाही. घरकुल लाभार्थी यांनी उसनवारी करून घरकुलचे काम सुरू केले. पण गटविकास अधिकारी देशमुख यांच्यामुळे घरकुल लाभार्थी यांचे पैसे परत गेले. सिंचन विहीरी 23-24 मध्ये 562 मजुर झाल्या परंतु त्यामध्ये चुकिच्या अटी लाऊन शेतकयांना नाहक त्रास देऊन शेतकऱ्यांना यांचे झीरो मस्टर मारून तसेच वेळेवर मस्टरचे पैसे न मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले. तसेच एप्रिल 2024 पासुन सिंचन विहीरीचे 55 प्रस्ताव पंचायत समिति येथे पडून आहे. त्यांना अद्यापपर्यंत मंजुरी नाही व सर्व ग्रामपंचायतींना प्रस्ताव पाठवू नये अशा सुचना सचिवांना दिल्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये विहीरीचे प्रस्ताव पडून आहे. अशा विविध योजनांमध्ये लाभार्थ्यांना लाभ मिळू शकला नाही.

त्यामूळे गटविकास अधिकारी देशमुख यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करून नुकसानग्रस्त लाभार्थी यांचे पैसे सात दिवसाच्या आत खात्यावर टाकण्यात यावे, अन्यथा पंचायत समिति कार्यालय समोर आत्मदहन करण्याचा इशारा लाभार्थ्यांनी यावेळी दिला. यावेळी भाजपा मोर्शी विधानसभा निवडणूक प्रमुख मनोहर आंडे, जिल्हा उपाध्यक्ष अर्चना मुरूमकर, गोपाल मालपे, इंद्रभूषण सोंडे, प्रवीण उर्फ शेशू मानकर, निळकंठ मुरूमकर, रूपाली सोंडे, योगेश्वर खासबागे यांच्यासह भाजपचे अन्य पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तडजोडीसाठी साडे तेरा हजार ग्राहकांना महावितरणची नोटीस

- राष्ट्रीय लोक अदालतमध्ये सहभागी होण्याचे आवाहन
- व्याज आणि विलंब आकार होणार माफ

महासागर प्रतिनिधी

अमरावती, ( दि. 25 ) - वीज बिल थकल्यामुळे मार्च 2024 पुर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या जिल्ह्यातील 13 हजार 583 वीज ग्राहकांनी जिल्ह्यात होणार्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये सहभाग नोंदवून तडजोडीने वाद मिटवावा आणि महावितरणच्या व्याज आणि विलंब आकाराच्या माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले आहे.

जिल्हा तथा तालुका विधी सेवा प्राधिकरणाकडून (28 सप्टेंबर) जिल्हा आणि तालुकास्तरीय दिवानी आणि फौजदारी न्यायालयात आयोजित लोक अदालतमध्ये महावितरणने दाखलपूर्व असलेली आणि कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेली 13 हजार 583 प्रकरणे 28 कोटी 97 लाख रूपयाच्या तडजोडीसाठी ठेवली आहे. ग्राहकांना याचा लाभ घेता यावा यासाठी अधीक्षक अभियंता यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्याच्या विधी विभागाकडून या सर्व ग्राहकांना नोटीस देण्यात आली आहे. महावितरणकडून नोटीस पाठविण्यात आलेल्या ग्राहकांमध्ये 4290 ग्राहक हे अमरावती ग्रामीण विभागातील असून त्यानंतर अचलपूर विभागातील 4099 ग्राहकाचा समावेश आहे. अमरावती शहरात नोटीस पाठविण्यात आलेल्या ग्राहकाची संख्या 2556 आणि मोर्शी विभागात ती 2638 आहे.